# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २६४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. संपत जगन्नाथ शीद,<br>मु.पो. कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, इस्लामपूर २, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संपत जगन्नाथ शीद, मु.पो. कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली यांनी अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनिमय २००६ मधील नियम ६.१० नुसार मंचामध्ये दि. १३.१०.२०१० ला गाऱ्हाणे दाखल केले. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदाराने आपल्या शेतीसाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वितरण कंपनीकडे अर्ज केला व प्रोसेसिंग फी रु. ५०/– पावती क्र. ४८१५८८९ दि.१३.५.२०१० रोजी भरली. ग्राहकाचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार त्यांना मुदतीत चलन दिले नाही.

यापूर्वी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २०.९.२०१० ला तक्रार दाखल केली त्याचे आदेश दि. २७.९.२०१० ला झाले. मंचाकडून अपेक्षित मदत – विहीत मुदतीत चलन मिळावे व विलंबाबाबत भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देवूनही दि. २.११.२०१० पर्यंत लेखी अहवाल दिला नाही, परंतु दि. २२.१२.२०१० रोजी मंचासमोर सुनावणीच्यावेळी दिला. त्यामध्ये ग्राहकाचे अंदाजपत्रक दि. ३०.१०.२०१० रोजी मंजूर करुन ग्राहकास पैंसे भरण्यासाठी चलन देणेत आले व ग्राहकाने दि. ३०.११.२०१० रोजी पैंसे भरले. सदर ग्राहकाचे कनेक्शन देणेसाठी ०.१२ कि.मी. एल.टी. वाहिनी लागते. ग्राहकाचा चाचणी अहवाल दि. १०.११.२०१० रोजी प्राप्त झाला आहे. ग्राहकाच्या कनेक्शनसाठी एल.टी. लाईन उभारणीचे काम सुरु असून त्यांना दि. ५.१.२०११ पर्यंत कनेक्शन देण्यात येईल.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २२.१२.२०१० रोजी घेण्यात आली. वितरण कंपनीचे अधिकारी उपस्थित. त्यांनी ग्राहकास दि. ३०.१०.२०१० रोजी चलन देण्यात आले व ग्राहकाने चलनाचे पैंसे भरल्याचे सांगितले. तक्रारदाराने चाचणी अहवाल दि. १०.११.२०१० ला दिला व त्यांना वीज कनेक्शन दि. ५.१.२०११ पर्यंत देण्यात येईल असे सांगितले. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. त्यांनी सुनावणीचेवेळी मंचासमोर अधिकारपत्र दाखल केले. श्री. खापरे यांनी सदर ग्राहकास विद्युत पुरवठा निश्चित कालावधीत वि.प. देणार असलेने ग्राहकाची तक्रार विनाशर्थ मागे घेणेची परवनागी मिळावी असे वि.प.च्या पत्रावर मंचासमोर लिहून दिले.

कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार दि. १२.६.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते ते प्रत्यक्षात दि. ३०.१०.२०१० ला देण्यात आले. विलंबाबाबत वि.प.ने स्पष्टीकरण दिले नाही. वितरण कंपनी विलंबाबाबत भरपाई देणेस जबाबदार आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. परंतु ग्राहकास दि. ५.१.२०११ पर्यंत वीज जोडणी देण्याचे वि.प.ने कबूल केल्यामुळे ग्राहक प्रतिनिधीनी तक्रार विनाशर्थ मागे घेतल्याने निकाली काढण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) ग्राहक प्रतिनिर्धीनी यांनी वि.प.च्या अर्जावर दि. ५.१.२०११ पर्यंत वीज जोडणी मिळणार असल्याने तक्रार विनाशर्थ मागे घेत असल्याचे लेखी लिहून दिले असल्याने तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.